सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील प्रवेश प्रक्रिया नोंदणी शुल्क वाढ प्रकरणी चौकशी करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-३३१५/प्र. क्र.३७०/व्यशि-३,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १० जानेवारी, २०१८.

वाचा:

१) संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. २०/सीटीएस/२०१५/६०५, दि. २८/१२/२०१५.
२) संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. ६/तक्रार/२०१७/३०,दि. २२/८/२०१७ व ६/तक्रार/२०१७ दि. ६/९/२०१७.

प्रस्तावना:

तत्कालीन संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वरिल संदर्भ क्र. १ येथील दि. २८/१२/२०१५ च्या पत्रान्वये सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील प्रवेश नोंदणी शुल्क वाढ प्रकरणी चौकशी करणेबाबत शासनास अहवाल सादर केला आहे. सदर अहवालामध्ये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले असून या प्रकरणी शासन स्तरावर सखोल चौकशी करण्याची विनंती शासनास केली आहे. त्याअनुषंगाने प्रस्तूत प्रकरणाची सखोल चौकशी करून शासनास अहवाल सादर करण्यासाठी चौकशी समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामध्ये सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील प्रवेश नोंदणी शुल्क वाढ प्रकरणी झालेली प्रशासकीय व वित्तीय अनियमितता, फसवणूक व निधीच्या गैरव्यवहाराबाबत या प्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी खालीलप्रमाणे चौकशी समिती गठीत करण्यात येत आहे:-

१.	श्री. आनंद रायते, आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा (CET), महाराष्ट्र राज्य, मुंबई.	अध्यक्ष
२.	श्री. गिरीश देशमुख, सहसंचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई. (वित्त विभागाचे प्रतिनिधी)	सदस्य
३.	श्री. पी.टी.देवताळे, सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.	सदस्य सचिव

२. सदर चौकशी समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील:-

१. संदर्भाधिन (१) येथे नमूद तत्कालीन संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.२०/सीटीएस/२०१५/६०५, दि. २८/१२/२०१५ अन्वये सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील प्रवेश नोंदणी शुल्क वाढ प्रकरणी चौकशी करणेबाबत शासनास सादर केलेल्या अहवालाची तपासणी करून अहवालामध्ये उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची सखोल चौकशी करणे.

२. ऑगस्ट २०१५ च्या प्रवेश प्रक्रीयेच्यावेळी सि.एम. सी. ला रुपये ३०.०० वरुन रुपये ७८.०० प्रति उमेदवार या दराने ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेचे कामकाज देण्याची कार्यवाही संस्था व्यवस्थापन समिती, औ. प्र. संस्था, दोडामार्ग यांनी त्यांच्यास्तरावरून केलेली आहे. याबाबत संचालनालय तसेच शासन स्तरावर कोणतीही मान्यता देण्यात आलेली नाही याबाबत सखोल चौकशी करणे.

३. सदर ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रशासकीय व वित्तीय अनियमितता झाल्याचे स्पष्ट झाल्यास सदर अनियमिततेस कारणीभूत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे विरूध्द जबाबदारी निश्चित करून अहवाल शासनास सादर करणे.

३. सदर चौकशी समितीस सर्व आवश्यक ती कागदपत्रे संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपलब्ध करून द्यावीत.

४. उपरोक्त समितीने त्यांचा अहवाल तीन महिन्याच्या आत शासनास सादर करावा.

५. सदर समितीला कामकाज करण्यासाठी एक कक्ष व आवश्यक ती साधनसामुग्री उपलब्ध करून देण्याची व्यवस्था संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११०१६५४१७७५०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sakharam Dina Kharat

Digitally signed by Sakharam Dina Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SD And E Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c6d1f4d2e41b8e84bb98ddddcac3054927f82f9c1a5810e2874cdac2c44c28c2, cn=Sakharam Dina Kharat
Date: 2018.01.11 17:04:07 +05'30'

(स.दि.खरात)
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा (CET), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. श्री.गिरीश देशमुख, सहसंचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई.

३. श्री. पी.टी.देवताळे, सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
२. मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे खाजगी सचिव.
३. मा. राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे खाजगी सचिव.
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
५. मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. मा. सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,मंत्रालय, मुंबई-३२
७. मा. उप सचिव (व्यशि),कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे स्विय सहायक.
८. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.
९. निवड नस्ती (व्यशि-३).